# भोगवटा प्रमाणपत्र (Occupancy Certificate)

(महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ४५ प्रमाणे)
(प्रमाणित विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली, नियम क्र. ७.६)

जावक क्र. २०९६ दिनांक ९६/६/२०२२

मौजे सावखेडा बु. ता.जि.जळगाव येथील ग.नं.१८२/१ मधिल भूखंड क्र.१३+१४/१ ला या कार्यालयाने पत्र क्र.३८८६, दि.३१.१२.२०२१ अन्वये रहिवास प्रयोजनार्थ बांधकाम मंजुरीची शिफारस केलेली आहे व त्याप्रमाणे बांधकाम नकाशांना आपण पत्र क्र.जमीन/बांधकाम/एसआर/१४/२०२१ दि.२५.०४.२०२२ अन्वये बांधकाम आराखडयास मंजुरी प्रदान केलेली आहे.

अर्जदार श्री.योगेश बाळकृष्ण बिर्ला रा.जळगाव यांनी बांधकाम पुर्ण झाल्याबद्दलचा प्रस्ताव उपविभागीय अधिकारी, जळगाव भाग, जळगाव यांचे कार्यालयास सादर केला आहे. सदर प्रस्तावासोबत कन्सल्टींग इंजिनिअर्स /आर्किटेक्चर **श्री. चद्रकांत विसपुते** यांनी सदर मंजुर बांधकाम नकाशाप्रमाणे बांधकाम पुर्ण झाले असल्याबाबतचे प्रमाणपत्र सादर केले आहे. त्याचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

बांधकामाचा तपशील

या इमारतीला देण्यात आलेल्या जोते तपासणी व पुर्णत्वाच्या दाखल्याचा थोडक्यात गोषवारा

| अ. क्र. | इमारत | मंजूर नकाशावरील तपशिल | जागेवरील बांधकामाचा तपशिल | जोते तपासणी प्रमाणपत्राचा पत्र क्र. व दि. | पुर्णत्वाचा दाखला दिल्याचा पत्र क्र. व दि. |
|---|---|---|---|---|---|
| १ | १ | ग्राउंड + ४ | ग्राउंड +४ | जोते तपासणी यापुर्वी करण्यात आलेली नाही. तथापि तळ मजल्यास यापूर्वी आपल्या कार्यालयाचा आदेश क्र.११२६, दि.२६.३.२०२१ अन्वये दिलेला आहे. भोगवटा प्रमाणपत्र देण्यात आलेले आहे. | यापुर्वी पुर्णत्वाचा दाखला तळमजल्यास आता त्यावरील ०४ मजल्याचे भोगवटा प्रमाणपत्र देण्यात येत आहे |

प्रस्तावासोबत मंजूर रेखांकन / बांधकाम नकाशानुसार हद्द कायम मोजणी सादर केलेली नाही. फक्त बांधकामाचे प्रमाणित नकाशे अर्जदारांनी सादर केलेले आहेत. मंजूर बांधकाम नकाशामध्ये दर्शविलेल्या हद्दीनुसार तपासणी केलेली आहे. भोगवटा दाखला बाबतचा गोषवारा खालील प्रमाणे आहे.

| अ. क्र. | इमारत क्र. | मंजूरी प्रमाणे | प्रत्यक्ष जागेवर | मजला | मंजूर बांधकाम नकाशानुसार क्षेत्र चौ. मी. | सदनिका | एकूण सदनिका | भोगवटा दाखल्यासाठी एकूण सदनिका |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | १ | ग्राउंड +४ | ग्राउंड +४ | तळमजला | १२० | ८ दुकाने | ८ दुकाने | ८ दुकाने |
| | | | | पहिला | २६५.७९५ | ०५ | ०५ | ०५ |
| | | | | दुसरा | २६५.१६५ | ०५ | ०५ | ०५ |
| | | | | तिसरा | २६५.७९५ | ०५ | ०५ | ०५ |
| | | | | चौथा | १७२.९९ | ०३ | ०३ | ०३ |
| | | | | एकूण | ९८१.५८ | १८ | १८ | १८ |

..२..

पुर्णत्वाचा दाखला / भोगवटा प्रमाणपत्र अपेक्षिलेल्या रहिवास इमारतीचे बांधकाम क्षेत्र ९८१.५८३ चौ.मी. हे या कार्यालयाने मंजूरीस्तव शिफारस केलेल्या बांधकाम नकाशाप्रमाणे केले आहे तसा अभियंता श्री. **चद्रकांत विसपुते** यांनी सादर केलेल्या दाखल्यानुसार इमारतीस भोगवटा प्रमाणपत्र (Occupance Certificate) खालील अटी / शर्तीस अधिन राहुन निर्गमित करणेची शिफास करण्यात येत आहे.

अटी / शर्ती

१) सहायक संचालक, नगर रचना, जळगाव शाखा यांनी पत्र जा. क्र.३८८७, दि.३१.१२.२०२१ अन्वये मंजुरीची शिफारस केलेली असून उपविभागीय, अधिकारी, जळगाव भाग, जळगाव यांनी दि.२५.०४.२०२२ अन्वये मंजूरी दिलेली आहे. उपरोक्त दोन्ही पत्रातील अटी व शर्ती अर्जदार यांचेवर बंधनकारक राहील.

२) स्थळदर्शक नकाशावर दर्शविल्याप्रमाणे नियोजित बांधकामापासुन, पुढील, मागील व बाजुची सामासिक अंतरामधील जागा कायम खुली ठेवावी.

३) नियोजन बांधकामा मध्ये मंजुरीपेक्षा वेगळे बदल करावयाचे झाल्यास किंवा वापर बदलावयाचा झाल्यास या कार्यालयाची पुर्व परवानगी घेणे आवश्यक आहे.

४) नियोजित बांधकामामुळे भुखंडावर असलेल्या कोणत्याही वहीवाटीने हक्काचा भंग होणार नाही याची जबाबदारी अर्जदार / मालक यांची राहील.

५) श्री. **चद्रकांत विसपुते** यांनी सादर केलेल्या प्रमाणपत्रानुसार विषयांकित जागेत Rain Water Harvesting व Solar Water System कार्यान्वियत करणे अर्जदार यांचेवर बंधनकारक राहील.

६) प्रस्तुत इमारतीचा वापर दाखला हा अर्जदार अभियंता व स्ट्रक्चलर इंजिनियर श्री.मोहित पाटील यांनी प्रस्तावासोबत सादर केलेल्या कागदपत्रांच्या व प्रमाणपत्रांच्या आधारे शिफारस करण्यात येत असून त्यामध्ये भविष्यात काही त्रुटी आढळून आल्यास अथवा त्यांची विधीग्राहयता सपुष्टात आल्यास अथवा न्यायलयीन स्थगीती / हुकूम लपवून ठेवल्यास सदरच्या भोगवटा इमारत वापर दाखल्याची विधि-ग्राहयता संपुष्टात येईल.

७) सदरच्या इमारत वापर दाखल्यानुसार इमारतीचा रहिवास वापर करावयाचा असून - याव्यतीरिक्त वेगळा वापर सुरु केल्यास वापर दाखला हा रद्द समजण्यात येईल. तसेच सदरच्या इमारतीची स्टॅबीलीटी व आयुष्यमानाबाबत व बांधकाम मंजूर नकाशाप्रमाणे असल्याबाबत सादर केलेले प्रमाणपत्रातील स्वाक्षरीदार, संबधीत विकासक / वास्तुविशारद / सल्लागार अभियंता / स्ट्रक्चरल अभियंता हे जबाबदार राहतील.

८) अर्जदाराने पुरेशी आवश्यक अग्नीशमनाची व्यवस्था इमारतीमध्ये करणे आवश्यक आहे.

९) विषयाधिन प्रकरणी अभियंता श्री.चंद्रकांत विसपुते यांनी प्रस्तुत इमारतीच्या भोगवटाबाबत पत्र सादर केलेले आहे. त्यानुसार वरील सर्व प्रमाणपत्राच्या अधिन राहुन भोगवटा प्रमाणपत्र देण्यात येत आहे. त्यात काही त्रुटी अथवा दिशाभुल करणारे असल्यास व प्रत्यक्ष जागेवर मंजूर बांधकाम नकाश्याव्यतीरिक्त जास्तीचे बांधकाम केल्यास / केले असल्यास संबधीत वास्तुविशारद व विकसन कर्ते जबाबदार राहतील.

..३..

१०) प्रमाणित मंजूर एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहण नियमावलीमधिल नियम २.८ नुसार संबधीत प्राधिकारी यांनी बांधकाम नकाशे मंजूर केलेले असल्यास अथवा नसल्यास त्यांनी जागेवर बांधकामाची पाहणी केली असल्यास किंवा नसल्यास, यापैकी काही असले तरी विकास नियंत्रण नियमावलीनुसार आणि भारतीय प्रमाणता नुसार सुरक्षिततेच्या सर्व निकषांचे पालन करुन नियोजित बांधकाम करणेची जबाबदारी जमिनमालक / विकासक / वास्तुविशारद/ अभियंता यांची राहील.

सबब उपरोक्त तपशीलामध्ये नमूद रहिवास वापराचे इमारतीस भागशः भोगवटा प्रमाणपत्र वरील अटी / शर्ती वर देण्यात येत आहे.

(रा.म. पाटील),
सहायक संचालक,
नगर रचना, जळगाव

उपविभागीय अधिकारी,
जळगाव, भाग जळगाव

प्रत – १) सहायक संचालक, नगर रचना, जळगाव शाखा.
२) श्री.योगेश बाळकृष्ण बिर्ला,रा.जळगाव यांना माहितीसाठी.
३) तलाठी / ग्रामसेवक,सावखेडा ता.जि.जळगाव यांना माहितीसाठी व कर आकारणी करीता रवाना.